RNI No. MAHBIL /2012/46121

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग दोन

वर्ष ९, अंक ३] बुधवार, जानेवारी १८, २०२३/पौष २८, शके १९४४ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १२.००

**असाधारण क्रमांक ३**

**प्राधिकृत प्रकाशन**

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

स. अभि/सर्व्हे/प.उ./३४६ / जन/एच व के विभाग, दिनांक २७ डिसेंबर २०२२.

**सार्वजनिक सूचना**

**बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम २९७ (१) (ब) अन्वये के/पूर्व विभागातील टी.पी.एस. ५, विलेपार्लेमधील अंतिम भूखंड क्र. ६ व १२ जवळील तसेच अंतिम भूखंड क्रमांक ४, ५, १३ आणि १४ यांच्यामधून जाणाऱ्या टीपी रस्त्यास ९.१५ मीटर रुंदीची रस्ता रेषा विहित करणे.**

बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (आजतागायत सुधारित) च्या कलम २९७ (१) (ब) अन्वये खालीलप्रमाणे जाहीर सूचना देण्यात येत आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के/पूर्व विभागातील टी.पी.एस. ५, विलेपार्ले (पूर्व) मधील अंतिम भूखंड क्रमांक ६ व १२ जवळील तसेच अंतिम भूखंड क्रमांक ४, ५, १३ आणि १४ यांच्यामधून जाणाऱ्या टीपी रस्त्यास ९.१५ मीटर रुंदीची रस्ता रेषा विहित करणेचा प्रस्ताव महापालिकेच्या सभेमध्ये, सदर सूचना प्रसिद्ध केल्यापासून ३० दिवसांच्या नंतर येणाऱ्या किंवा जेव्हा केव्हा सदरहू प्रस्ताव, निकालात काढता येईल, अशा महापालिकेच्या सभेत मांडण्यात येईल.

संदर्भीत रस्ता हा के/पूर्व विभागातील टी.पी.एस. ५, विलेपार्ले (पूर्व) मधील टीपी रस्ता आहे. तसेच सदर रस्त्याची रुंदी बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (आजतागायत सुधारित) च्या कलम २९७ (१) (ब) अन्वये ९.१५ मीटर करण्याचे प्रस्तावित आहे. नगरविकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०३४, नियम १९(३), टिप नं. १ च्या अनुषंगाने आणि महापालिका आयुक्त यांच्या क्र. CHE/DP/73 / Gen/2019-20 च्या परिपत्रकान्वये ९.०० मीटर अथवा त्यापेक्षा अधिक रुंदीकरण करण्याचे निर्देशित केले आहे.

मा. महानगरपालिका आयुक्त यांनी मंजुरी क्र. MCP/2147, दि. १९ डिसेंबर २०२२ अन्वये तत्त्वतः मंजूर केलेली प्रस्तावित ९.१५ मीटर रस्ता रेषा (A-B) नकाशावर हिरव्या रंगाने दर्शविली आहे व ज्यामध्ये सद्यःस्थितीत ६.७० ते ७.५० मीटर टीपी रस्ता नकाशावर दर्शविलेला आहे. सदर नकाशा सहायक अभियंता (सर्वेक्षण) एच व के विभाग यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे, त्यांचा कार्यालयीन पत्ता पुढीलप्रमाणे आहे. उप प्रमुख अभियंता (इ.प्र.), प.उप.-१ यांचे कार्यालय, 'हिंदुहृदयसम्राट श्री. बाळासाहेब ठाकरे मंडई,' ६ वा मजला, नवीन मजास मार्केट, पूनमनगर, मजास गांव, जे.व्ही.लिंक रोडसमोर, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई ४०० ०९३ व सहायक आयुक्त के/पूर्व विभाग यांच्या के/पूर्व विभाग कार्यालय इमारत, आझाद रोड, गुंदवली, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०६९ येथील कार्यालयामध्ये उपलब्ध आहे.

ज्या कोणास उपरोक्त प्रस्तावाबाबत प्रतिनिवेदने / हरकती पाठवावयाच्या असतील तर त्यांनी त्या उप प्रमुख अभियंता (इ.प्र.) प.उप.-१ यांचे कार्यालय, 'हिंदुहृदयसम्राट श्री. बाळासाहेब ठाकरे मंडई', ७ वा मजला, नवीन मजास मार्केट, पूनमनगर, मजास गांव, जे.व्ही. लिंक रोडसमोर, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई ४०० ०९३ अथवा सहायक आयुक्त के/पूर्व विभाग यांच्या के/पूर्व विभाग कार्यालय इमारत, आझाद रोड, गुंदवली, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०६९ येथील कार्यालयात सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत (सार्वजनिक व साप्ताहिक सुट्टीसह) प्राप्त होतील अशाप्रकारे पाठवाव्यात. त्यानंतर प्राप्त झालेली प्रतिनिवेदने/हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत, याची कृपया नोंद घेण्यात यावी.

दिनांक १८ जानेवारी २०२३,
PRO/2616/ADV/2022-23.

**सुनिल हि. राठोड ,**
उप प्रमुख अभियंता (इ. प्र.) प. उप.-१.

## BRIHANMUMBAI MUNICIPAL CORPORATION

AE/Survey/346/Gen/H & K, dated 27th December 2022.

## PUBLIC NOTICE

**Proposed 9.15 Mtr. wide Regular Line to TP Road touching to FP No.6 and 12 and passing between FP No.4, 5, 13 and 14 of TPS-V Vileparle (East) in K/East Ward Under section 297(1)(b) of MMC Act, 1888.**

Notice is hereby given pursuant to section 297(*1*)(*b*) of MMC Act, 1888 (as mentioned up to date) that, the undersigned proposes to apply to the Brihanmumbai Municipal Corporation at their meeting to be held after 30 days from display of this Public Notices or such day thereafter, as the said application can conveniently be disposed off for authority to accept proposed Prescription of 9.15 Mtr. wide Regular Line of TP road touching to FP No. 6 and 12 and passing between FP No. 4, 5, 13 and 14 of TPS-V Vileparle (East) in K/East Ward.

The width of said TP road is 6.70 to 7.50 Mtr. and now same is proposed to widened to 9.15 Mtr. under section 297(*1*)(*b*) of MMC Act, 1888 (as mentioned up to date), as per Note-1 of Regulation 19(*3*) of DCPR, 2034 and as per subsequent circular of Hon'ble Municipal Commissioner u/No. CHE/DP/73/Gen/2019-20 directing to widen the roads of width less than 9.00 Mtr. to 9.00 Mtr. and above, as per site condition through MR & TP or MMC Act.

The plan showing proposed 9.15 Mtr. wide Regular Line approved in principal by Hon'ble Municipal Commissioner u/No. MCP/2147, dated 19.12.2022, as shown in green colour, marked A-B with prevailing alignment of 6.70 to 7.50 Mtr. wide Road shown on plan is available for inspection in the office of Assistant Engineer (Survey) W.S.-I, whose office is situated at 6th floor, Hindu Hrudaysamrat Shri Balasaheb Thakre Market at New Majas, Poonam Nagar, J.V.Link Road, Jogeshwari (E.), Mumbai 400 093 and in the office of Assistant Commissioner, K/East Ward whose office address is as K/East Ward Office Building, Azad Road, Gundavali, Andheri (East), Mumbai 400 069.

Any person desirous of making any representation to the Corporation or bringing before the corporation any suggestion/ objection in respect of the said proposal may do so by letter addressed to Dy.Ch.E. (B.P.)W.S.-I whose office address is as 7th floor, Hindu Hrudaysamrat Shri Balasaheb Thakre Market at New Majas, Poonam Nagar, J. V. Link Road, Jogeshwari (E), Mumbai 400 093 or to Assistant Commissioner, K/East Ward whose office address is as K/East Ward Office Building, Azad Road, Gundavali, Andheri (East), Mumbai 400 069 and deliver at the said offices within 30 days from the publication of this notice (including Holidays and weekly off). The letter received after such date, cannot be considered, which please be noted.

Dated 18th January 2023, SUNIL H. RATHOD,

PRO/2616/ADV/2022-23. Dy.Ch.Engineer (B.P.), W.S.-I.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.